**CNR No. MHSI01000783-2018**

**नियमित दिवाणी पुनर्वाद क्र. ११२/२०१८ मधील नि. ४५ खालील आदेश.**

**(चंद्रकला धुरी वगैरे -पुनर्वादी वि. महादेव गावकर (मयत) तर्फे वारस महानंदा गावकर वगैरे- उत्तरवादी)**

-----

१. प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र. १(अ) ते १(ड) यांनी त्यांचेविरुध्द दि. १४/११/२०२२ व दि. २०/०२/२०२३ रोजी पारीत केलेले एकतर्फी सुनावणीचे आदेश रद्द करणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जाचे व पुनर्वादी यांनी दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

३. सदरहू उत्तरवादींचे कथनानुसार त्यांना वारस अर्जांच्या नोटीसींची बजावणी झाल्यानंतर ते पुनर्वादाकामी हजर झाले. परंतु पुनर्वादाकामी नोटीस बजावणी झाल्यानंतर पुन्हा पुनर्वादाकामी हजर व्हायचे असते याबाबतचे कायद्याचे ज्ञान त्यांना नसल्यामुळे ते पुनर्वादाकामी न्यायालयात हजर राहिले नाहीत. त्यामुळे उत्तरवादी क्र. १(अ), १(क) व १(ड) यांचेविरुध्द दि. १४/११/२०२२ रोजी व उत्तरवादी क्र. १(ब) यांचेविरुध्द दि. २०/०२/२०२३ रोजी एकतर्फी सुनावणीचे आदेश पारीत झालेले आहेत. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत पुनर्वादाकामी हजर होवून त्यांची बाजू मांडणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन सदरहू एकतर्फी सुनावणीचे आदेश रद्दबातल करण्याची विनंती केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाकामी पुनर्वादी यांनी , प्रस्तुत पुनर्वादाचे कामकाजामध्ये विलंब होण्याचे हेतूने सदरहू उत्तरवादी हजर राहिले नाहीत , त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा व मंजूर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त खर्च बसविण्यात यावा, अशी हरकत नोंदविली आहे.

५. जरी पुनर्वादी यांनी सदरहू अर्जास हरकत नोंदविली तरी अर्जातील कारणाचा विचार करता सदरहू उत्तरवादी यांना समाधानकारक बचावाची संधी देणेकरीता त्यांचेविरुध्दचे दि. १४/११/२०२२ व दि. २०/०२/२०२३ रोजीचे एकतर्फी सुनावणीचे आदेश रद्द करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उत्तरवादी क्र. १(अ) ते १(ड) यांचेविरुध्दचे दि. १४/११/२०२२ व दि. २०/०२/२०२३ रोजीचे एकतर्फी सुनावणीचे आदेश रद्द करणेत येत आहेत.

SANJAY JUGALKISHOR BHARUKA

Digitally signed by SANJAY JUGALKISHOR BHARUKA
Date: 2023.10.09 17:35:11 +0530

(सं.जु.भारुका)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.

दिनांकः– ०९/१०/२०२३